सोमवार ता. ९ जुलै १९४५ या दिवशी सुखासीन वृत्तींत असतांना दुपारी २ वाजतां सहज अशी कल्पना आली की इंजिनिअरिंग कॉलेज काढण्याचा आपणहि प्रयत्न करावा. इच्छा एकदम कशी उद्‌भूत झाली याचा मागमूसही लागूं शकत नाही. कारण एप्रिल - मे १९४५ मध्यें माझे स्नेही श्री. द. गो. फडके, बी. व्ही. धडफळे इंजिनिअर व श्री. एस्. जी. भालेराव असे माझेकडे येऊन इंजिनियरिंग कॉलेज काढावें की काय याचा विचार करून गेले होते. त्या वेळी हे काम फार जबाबदारीचें, आपल्या आवाक्याबाहेरचें असे समजून आपण ते करूं शकत नाही असाच निर्णय सर्वांनी घेतला होता. त्यानंतर जूनमध्ये पुन: पुणे इंजिनियरिंग कॉलेजच्या प्रवेशाबाबत सर्व समाजाचीच होणारी अडचण याची सामाजिक चर्चेच्या स्वरूपाची चर्चा स्नेही मंडळींबरोबर होत असे. त्या वेळींही हे काम अतिशय दुर्घट अडचणींचे आहे असे मनाला पटत होते. या दोन प्रसंगांवरून ९ जुलैला असा एक फिरून विचार यावा अशी शक्यता दिसत नाही. तरी पण ती उद्भवली एवढाच अनुभव नोंदविता येईल.

हा विचार उद्भवल्यावर त्याने मनाची इतकी पकड घेतली की जवळजवळ अर्धा तास स्वप्नमय विचाराच्या प्रवाहांतच निमग्न होतों, अडीच तीन वाजतां काही तरी मनाचा निश्चय झाला. कॉलेज काढण्यासंबंधी जो आराखडा तयार करावयास पाहिजे, त्या दृष्टीनें मदत होण्यासारखे पहिले नांव सुचलें ते श्री. शंकर रामचंद्र भागवत यांचे. त्यांनी म्युनिसिपालटीत अनेक योजना प्रत्यक्ष कार्यवाहीत आणलेल्या असल्यामुळे त्यांचा उपयोग कॉलेज स्थापनेच्या योजनेंत निश्चित होईल असे वाटून लगेच कपडे करून श्री. भागवत यांचे घरी गेलों. ते डेक्कन जिमखान्यावर गेल्याचें कळले, तेव्हां त्यांचे घराशेजारींच श्री. सखाराम विनायक आपटे यांचे घर आहे, तेथे गेलों. ते नुकतेच इंजिनिअरिंग कॉलेजातून निवृत्त झाले होते. त्यांचा माझा परिचय असल्यामुळें असे कॉलेज काढण्याबद्दलचा विचार त्यांना विनंती केली. त्यांनी सांगितले कीं अशी योजना तयार करण्याचे कामीं माझा उपयोग होणार नाही. कारण तसा विचार मीं केलेला नाहीं. परंतु कॉलेज निघालें तर माझा उपयोग शिक्षक म्हणून होऊं शकेल. त्यावेळी ते कॉलेज पुण्यांतच काढावें अशी दृढ कल्पना माझ्या मनांत होती.

त्यांचेकडून निघालों तो डेक्कन जिमखान्यावर श्री. भागवत यांची भेट घेण्यास गेलों. त्यांची भेट झाली व त्यांना मी आपली कल्पना निवेदन केली. त्या वेळी ते अनेक को.

सोसायट्यांच्या हिशोबांच्या कामांत व्यग्र होते. तरी सुध्दां अर्धा तास वेळ देऊन त्यांनी माझे म्हणणे ऐकून घेतले. पण त्यांना अशा प्रकारचें डिग्री कॉलेज काढण्याची उपयुक्तता पटेनाशी झाली होती. त्यांचा मुख्य मुद्दा असा होता की, `खेडेगांवांतील अनेकविध सुधारणा करण्याकरितां रूरल इंजिनिअरिंग सारखें शिक्षण देणारी संस्था असावयास पाहिजे. तशीं काही योजना असली तर माझा उपयोग होऊ शकेल. तुमच्या कॉलेजांतून उत्तीर्ण होणाऱ्या व नोकरी शोधणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कॉलेज काढण्याची कल्पना मला तितकीशी पसंत नाही. म्हणून त्याची पुनरावृत्ति करण्याचे कॉलेजचे योजनेसाठी मी माझी शक्ती व बुध्दि खर्च करावी असें मला वाटत नाही.` त्यांचेकडून झालेली निराशा मोठीच होती. परंतु प्रयत्न सोडूं नये म्हणून श्री. आर. एस. गोखले यांचेकडे जाण्याचें योजलें. कारण मला असें कळले कीं, श्री. गोखले यांचे जवळ अशी काही तरी योजना तयार आहे. श्री. गोखले हे पुणे इंजिनियरिंग कॉलेजांत ड्रॉइंग विषय शिकवणारे शिक्षक होते. त्यांची भेट घेतां ते म्हणाले की, अशी स्कीम काढण्याइतका विचार मी केलेला नाही: तथापि निरनिराळया इंजिनिअरिंग कॉलेजांना लागणाऱ्या इमारतींचे नकाशे मी तयार केले आहेत; किंवा जरूर लागली तर मी नवीन तयारही करून देईन. तेथे काही लाग लागला नाहीं म्हणून कोठें जावें असा विचारच पडला. टिळक रोड वरून जातां जातां श्री. जी. टी. गोखले यांच्याकडे जाण्याचा विचार मी अनपेक्षितपणेंच ठरविला. त्यांच्याकडे पांच वाजतां पोचलो. त्यांची भेट झाली. मी त्यांना माझे उद्दिष्ट सांगतलें व एकदम सर्वस्वी अनुकूल असा त्यांचा विचार माझ्या विचारांशी मिळाला. त्यांच्याहि मनांत असा कांहीतरी शिक्षणाचा उपक्रम केला जावा असा विचार असल्यामुळे अनाथ विद्यार्थि गृह संस्थेमार्फत इंजिनियरिंगचे शिक्षण द्यावें असे त्यांच्याहि मनांत होतें. तसा ते प्रयत्नही करीत होते. दोघांचे विचार जुळल्यामुळे त्यांनी मला मदत करण्याचे कबूल केले व लगेच पुढच्या गुरूवारीं दोघांच्या सोयीप्रमाणे पुणे इंजिनिअरिंग कॉलेजात जाऊन तेथील प्रोफेसरांनी भेटून योजना तयार करावी असे ठरले.

संवादी विचार मिळाल्याचें समाधान घेऊन मी घरी परत आलो, व ठरल्याप्रमाणे गुरूवारीं पुणे इंजिनिअरिंग कॉलेजात गेलो. तेथेंहि आम्हांस योजना करण्याचे कामीं अनुकूलताच दिसून आली. त्यानंतर तेथे तास दोन तास थांबून व थोडी माहिती घेऊन परत आलों. आम्हां उभयतांचे धोरण असें ठरले की, श्री. गोखले यांनी एक महिन्यांत योजना तयार करण्याचा प्रयत्न करावा, व मी एक लाख रूपयांच्या देणग्यांची आश्वासनें

मिळविण्याचा प्रयत्न करावा. कारण मुंबई विद्यापीठाकडे नवें इंजिनिअरिंग कॉलेज काढण्यासाठी अर्ज करावयाचा असला तर तो नेहमी ३१ ऑगस्टच्या आंतच करावा लागतो. याप्रमाणें कामाची वाटणी होऊन गुरूवारचा दिवस संपला. त्यानंतर महिनाभरांत श्री. गो. त्रिं. गोखले यांनी अत्यंत परिश्रम करून तपशीलवार माहिती घेऊन सुमारें १० ।१५ ऑगस्टपर्यंत योजना तयार करून दिली. माझ्या कांमातहि मला बरीच अनुकूलता दिसून आली. मी असें योजिलें होते कीं प्रत्येकीं दहा हजार रूपये देणारे सहा स्नेही निवडावे. त्याप्रमाणे एक ऑगस्टपर्यंत पुढील नांवे आश्वासन देणाऱ्यात नमूद करतां आली.

(१) मी स्वत: - दहा हजार रूपये व
(२) मी केलेल्या कृ. ब. साठे ट्रस्टकडून - पंधरा हजार रूपये.
(३) श्री. ध. कृ. रानडे (रानडे ब्रदर्स कंत्राटदार) - दहा हजार
(४) श्री. श्री. गो. मराठे - दहा हजार
(५) श्री. ना. ग. रानडे (मे. व्ही. आर. रानडे अँड सन्स ) - दहा हजार
(६) श्री. चं. गो. आगाशे - दहा हजार
(७) श्री. एफ. डी. पद्मजी - दहा हजार
(८) श्री. माणिकचंद वीरचंद शहा - दहा हजार

हे त्यांचे म्हणणे मला व्यक्तिश: सयुक्तिक वाटलें ; तरी पण एक वर्षभर सतत प्रयत्न करण्याची चिकाटी माझेजवळ राहील अशी खात्री माझी मलाच वाटेना. म्हणून मीं माझ्या मनाशी असा निर्णय घेतला कीं, नवीन सोसायटी स्थापन करून तिच्यामार्फत चालू वर्षीच अर्ज करावयाचा. कारण नवीन सोसायटी स्थापन करून त्यांत अपयश येण्यांत विशेष धास्ती नाही. फिरून दुसरे वर्षी प्रयत्न करण्यास वाव रहातोच. शिक्षण प्रसारक मंडळीसारख्या स्थिर संस्थेने असा अर्ज करण्यांत धोका होता; म्हणून थोडासा अविचारच करून, नवीन सोसायटी स्थापन करण्याच्या विचारास मी लागलो.

सोसायटी स्थापन करण्याचे कामी प्रि. ज. र. तथा नानासाहेब घारपुरे यांची मदत घण्याचे मी योजलें व त्याचेकडे जाऊन त्यांना सर्व हकीकत सांगितली. त्यांनी मला प्रोत्साहन देऊन या कामीं मदत देण्याचे कबूल केलें. पुण्यात चालू असलेल्या अनेक

संस्थांपैकी दोन चार संस्थांच्या घटना त्यांचेकडे नेऊन दिल्या व माझ्या संस्थेच्या ज्या विशेष अडचणी होत्या त्याही त्यांना सांगितल्या. माझ्या संस्थेत कायम काम करणारे व संस्थेचा भार उचलणारे लाइफ वर्कर्स असे नाहीत ही मोठीच अडचण होती. अनाथ विद्यार्थि गृहाची घटना स्वीकारण्यास सोयीची अशी मला वाटली. अनेक संस्थांच्या घटनांचा तरतमभावाने विचार करून निर्णय घेण्याइतका अवधिही नव्हता, व तशी मला व्यक्तिश: आकलनशक्तिही नव्हती. म्हणून त्यांचेवरच हा सर्व भार सोपवून घटनेचा एक तात्पुरता आराखडा टाईप करून घेतला.

त्यांत देणगीदारांची नांवे प्रस्थापक सभासद म्हणून दाखल केली. व इंजिनिअर्सपैकी श्री. आर. जी. सुळे (रिटायर्ड चीफ इंजिनिअयर), श्री. दामुआण्णा पोतदार (उत्साही व तरूण मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल इंजिनिअर), व श्री. जी. टी. गोखले यांचेहि प्रस्थापक सभासद म्हणून नांव घातलें. प्रि. नानासाहेब घारपुरे यांनी संस्थेत यावें अशी विनंती केली व ती त्यांनी मान्य केली. याप्रमाणे सर्व नांवे तयार झाल्यावर खूप वजनदार असा अध्यक्ष आपल्या संस्थेस मिळावा अशा हेतूने श्री. नानासाहेब घारपुरे यांच्या लॉ सोसायटीचे अध्यक्ष श्री. बाबासाहेब जयकर हे आमच्या सोसायटीस अध्यक्ष म्हणून मिळावे असा प्रयत्न करण्याचे ठरलें व त्यास प्रि. नानासाहेब यांनी संमति दिली. श्री. बाबासाहेब जयकर यांचा मुक्काम श्री. नाथीबाई ठाकरसी यांचे बंगल्यावर होता. त्यांचेकडे प्रि. नानासाहेब घारपुरे हे मला बरोबर घेऊन गेले.

इतकीं आश्वासने ३१ जुलैच्या आंतच मिळालीं. राहिलेल्या वीस हजारांकरिता आणखी दोन नांवे शोधत होतों व तीं मिळतील अशी मनाला खात्री वाटत होती. मुंबई विद्यापीठाकडे कॉलेज काढण्याचा अर्ज करावयाचा तर त्याकरिंता एक स्वतंत्र सोसायटी स्थापन करावयास पाहिजे. परंतु हे सगळेंच नवे मुंबई विद्यापीठाला पटण्यासारखे होणार नाही. असे वाटल्यावरून शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे, यांचेकडे एक विनंतीपत्र पाठविले की आम्ही एक लाख रूपये जमवितो व आणखीही पुढें लागणारे ५-७ लाख रूपये जमवण्याचा प्रयत्न करतों ; परंतु कॉलेज काढण्याचा विद्यापीठाकडे करावयाचा अर्ज शिक्षण प्रसारक मंडळीनें पाठवावा. त्यावेळी शि. प्र. मंडळींचे चेअरमन श्री. तात्यासाहेब केळकर होते. त्यांनी व इतर सभासदांनी अत्यंत सहानुभूतिपूर्वक विचार करून असे कळविलें की, `शिक्षण प्रसारक मंडळींने अर्ज

करावयाचा तर संस्थेजवळ पांच सहा लाख रूपयांची निश्चित आश्वासनें हवींत. त्याकरतां संस्थेच्या सहकार्याने प्रयत्न करावा व एक वर्षात इतकीं आश्वासने मिळवावी. हें काम हमखास होऊं शकेल. त्या बाबतीत संस्थेची जी मदत लागेल ती मिळेल.`

श्री. जयकर यांच्या भेटीत संस्था स्थापण्याचा हेतु, घटनेचा आराखडा व प्रस्थापकांची नांवे अशी त्यांस सर्व सांगितली. त्यांनी 'प्रयत्न चांगला आहे' असे म्हणून प्रोत्साहन दिलें. परंतु 'संस्था पुण्यातच होणार असल्यामुळे माझा तितकासा संबंध राहू शकणार नाही' म्हणून संस्थेत येण्याचे त्यांनी अमान्य केले; परंतु आणखी कांही वजनदार नांवे संस्थेत असावी तर तिला अधिक महत्व येईल असे सांगितलें. प्रि. नानासाहेब यांनी त्यांना असेही सुचविलें की लॉ सोसायटीच्या जागेपैकी कांही जागा नवीन कॉलेजला वर्कशॉपस् वगैरे बांधण्यासाठी देण्यासारखी आहे व प्रारंभी एकच वर्ग सुरू होणार असल्यामुळे लॉ कॉलेजपैकी एखादा वर्ग त्यांना देतां येईल, किंवा एका भागावर स्वतंत्र मजला बांधूनही तो त्यांना वापरता येईल, अशी त्या संस्थेची सोय आपण करून द्यावी याबद्दल संस्थचे सेक्रेटरी श्री. नानासाहेब घारपुरे यांनी श्री. जयकर यांस विचारलें. त्यास त्यांनी अनुकुलता दर्शवून कायदेशीर विचार करून आपल्या संस्थेच्या कामांत तें कसें बसेल याचा विचार करण्यास सांगितलें.

प्रि. नानासाहेब घारपुरे यांच्या सहानभुतीमुळे आमच्या देणग्यांपेक्षांही अधिक महत्वाचा असा जागेचा प्रश्न इतकया सुलभतेने सुटण्याची आशा वाटूं लागली. हे सुमारे ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यांत घडलें. त्यानंतर आणखी दोन वजनदार गृहस्थ मिळविण्यास आठ दिवसांचा अवधि राहिला होता. त्याबाबत विचार करतां श्री. म. वि. भिडे यांचे नांव मला सुचलें. मी त्यांचेकडे संस्थेची घटना वगैरे घेऊन जाण्यांचे ठरविलें व संस्थेची घटना छापून झाल्यावर मी त्यांचेकडे घेऊन गेलो. त्यांची माझी यत्किंचितही ओळख नसतांना सहानुभूति दाखवून उद्या निर्णय देतों असें त्यांनी सांगितलें. आम्ही प्रस्थापक सभासदांनी प्रत्येकीं दहा हजार रूपये दिले आहेत हे त्यांनी वाचलेंच होतें. त्याची त्यांना थोडीशी अडचण होत आहे असें माझ्या लक्षात आले म्हणून मी त्यांना श्री. जयकरांचे भेटींत घडलेली हकीकत सांगितली.

आपल्या येण्यानें संस्थेचें महत्व वाढेल व उपयुक्तता अधिक वाढेल व तो लाभ आम्हीं

देणगीपेक्षा अधिक समजतों. तेव्हा अनुकूल अभिप्राय द्यावा अशी विनंती करून आलों. ही पहिली भेट दिनांक ३१ ऑगस्टचे सुमारास झाली. त्यानंतर मला असे समजले की कर्नल एस. ए. फाटक यांचा श्री. भिडे यांचेशी चांगला परिचय आहे. तेंव्हा कर्नल एस. ए. फाटक यांचेकडे जाण्याचें ठरविलें. कर्नल फाटक यांचा माझा चांगला परिचय होता. आपल्या सेवानिवृत्तीनंतर ते तळेगांव येथील हॉस्पिटलमध्ये नि:स्वार्थीपणानें कित्येक वर्षे काम करीत असल्यामुळें आम्हां मित्रमंडळींच्या मनांत त्यांच्याबद्दल नितांत आदर असे. त्यांनी आमच्या कामी श्री. भिडे यांस भीड घालावी असें सांगण्यास आम्हांस संकोचहि वाटला नाही. आमच्या संस्थेंत दहा हजार रूपये देऊन तुम्हीही यावें असे सांगण्याचें अप्रशस्त धाडसही मी केलें. त्याबद्दल त्यांनी कौतुक करून श्री. भिडे साहेबांना मिळवून देण्याचें काम करण्याचें कबूल केले व स्वत:बद्दलचाही निर्णय एक दोन दिवसांत देतों असें सांगितलें.

याप्रमाणे दुसरे दिवशीं श्री. भिडेसाहेब यांची संमति घेण्यासाठीं मी त्यांची भेट घेतली. त्यांनी दहा पांच मिनिटें विचार करून संस्थेंत येण्यास संमति दिली. इतकेंच नव्हे तर संस्था सुरू झाल्यावर विद्यार्थ्यांच्या स्कॉलरशिपकरतां दहा हजारांची रक्कम ठेव म्हणून देण्याचा आपला मनोदय कळविला. संस्थेत आज प्रस्थापक म्हणून नांव दाखल केलें तरी ते इंदूर येथे न्यायाधीश म्हणून जाणार असल्यामुळें त्यांचा विशेष उपयोग होऊ शकणार नाही असाही इषारा त्यांनी दिला होता; परंतु त्यांचे वास्तव्य कायमचें पुण्यास असल्यामुळें त्यांचा लाभ आम्हांस घेतां येईल असे आम्हांस वाटत होते. कर्नल फाटक यांच्या शब्दामुळें श्री. भिडे यांची संमति मिळविणे सुलभ झालें याचा मला आनंद वाटला, म्हणून कर्नल फाटक यांचे आभार मानण्यास मी त्यांचे घरी गेलो. यांत आणखी एक हेतु त्यांचीही संमति मिळवावी असा होता. आणि मला त्यांची संमतिही मिळाली व दहा हजार रूपयांच्या देणगीचें आश्वासनही दुसरे दिवशी मिळालें. इतकी अनुकूल कृपादृष्टी परमेश्वराशिवाय कोणाकडूनही होणार नाहीं असेंच त्यावेळी मनास वाटलें.

२४ सप्टेंबरला त्यांच्या विम्याचे पैसे यावयाचे होते, त्यावेळी पैसे मिळतील असे कर्नल फाटक यांनी सांगितलें. याप्रमाणें संस्था स्थापण्यापूर्वी एक लक्ष रूपये जमविण्याचा माझा संकल्प सुलभतेनें सुटल्याचें पाहून मला काम करण्यास अत्यंत उत्साह वाटून

परमेश्वरी कृपा आपल्या बाजूस आहे असा भासही झाल्यासारखें वाटलें. त्यानंतर कर्नलसाहेबांनी सवडीने आपली स्वत:ची हकीकत सांगितली ती अशी कीं, त्यांनी संस्थेत पैसे देण्याचे कबूल केलें ते त्यांस त्यांचे वडिलांनी स्वप्नांत येऊन तसें सागितलें.

ता. २७ ऑगस्टचे सुमारास मी मुंबईस गेलों असतांना विद्यापीठाकडे कसा अर्ज करावयाचा त्याचा मसुदा यार करण्यासाठी प्रि. घारपुरे यांचेबरोबर दोन-तीन तास खर्च केले. ते म्हणाले की आपण युनिव्हर्सिटीत जाऊन व्हाइस चॅन्सेलर यांना भेटून येऊ. त्याप्रमाणे व्हाइस चॅन्सेलर यांची भेट घेण्यासाठी ते मला घेऊन गेले. त्या वेळी न्या. वाडिया हे व्हाइस चॅन्सेलर होते. त्यांचा व नानासाहेब यांचा चांगला परिचय होता. त्यांना श्री. नानासाहेब यांनी सर्व कल्पना समजावून दिल्यानंतर 'प्रयत्न अवश्य करावा ; युनिव्हर्सिटीकडून सहानुभूति अवश्य मिळेल' असे त्यांनी सांगितले. परंतु त्यांनी इषारा असा दिला की कमींत कमी पांच लक्ष रूपये असल्याशिवाय अशा कामाला हात घालणे धोक्याचें ठरेल. त्याबद्दल योग्य ती दक्षता तुम्ही घ्या. त्याबरोबर अनुकूल अशी एक बातमी त्यांनी दिली की दरवर्षी ३१ ऑगस्टलाच अशा कॉलेजसाठी अर्ज करावयाचे असतात ; तथापि यंदाचे वर्षीच विद्यापीठानें २५ तारखेंस असा ठराव केला आहे कीं से अर्ज करण्यास १५ सप्टेंबरपर्यंत मुदत वाढवून द्यावी. त्यामुळे सोसायटी रजिस्टर करून अर्ज करण्यास पंधरा दिवसांचा अधिक अवधि मिळाला.

ता. ३ सप्टेंबरला संस्था रजिस्टर करून युनिव्हर्सिटीच्या तपशिलाप्रमाणें अर्ज भरण्याचे तयारीस लागलो. त्या अर्जात तपशिलाच्या अनेक बाबी असतात. प्रिन्सिपॉल कोण, स्टाफ कोण कोण माणसें आहेत, जागा कोणती, वगैरे बाबी अर्जात भरणे आम्हांस शक्य झालें नाही. परंतु जेवढी माहिती भरतां येणे शक्य होती तेवढी भरून अर्ज १५ सप्टेंबरला नेऊन दिला. तोपर्यंत संस्था रजिस्टर झाल्याचें सर्टिफिकेटही आमच्या हाती आले नव्हतें. कारण त्यांत काही तांत्रिक अडचण आल्यामुळे संस्था रजिस्टर झाली नव्हती. त्या अडचणींचा शोध घेऊन त्यांचे निराकरण प्रि. नानासाहेब घारपुरे यांचे सल्ल्याप्रमाणें १५ तारखेला केले, व संस्था रजिस्टर झाल्याचें सर्टिफिकेट १७ सप्टेंबरला हाती आलें व मागाहून ते युनिव्हर्सिटीकडे पाठविण्यात आलें.

अर्ज केल्यानंतर एका महिन्यांत दोनचार गृहस्थांची एक कमिटी निवडण्यांत येते, व ती

अर्जातील माहितीप्रमाणे सर्व व्यवस्था आहे कीं नाहीं ते पाहून डिसेंबरपर्यंत आपला अभिप्राय कळविते, व त्यानुसार फेब्रुवारीत सिंडीकेट ठराव करून मान्यता देते व नंतर जूनमध्ये कॉलेज सुरू करतां येते. अर्ज दाखल झाल्याबरोबर कमिटी निवडण्यात आली. त्यांत श्री. आडवानी, मोडक, गुपचूप व कारेकर असे चार इंजिनिअर्स होते. त्यांनी आम्हांस पत्र लिहून प्रिन्सिपॉलचे नांव कळवा म्हणजे त्यांचेबरोबर विचारविनिमय करण्यास आम्हांस सोपे जाईल असे कळविले. आम्ही प्रिन्सिपॉलचे म्हणून कराचीचे सेवानिवृत्त प्रि. जी. एन. गोखले हे मिळावेत असा प्रयत्न करीत होतो. त्यांचेकडे सर्व योजना पाठविली. त्यांनी इतकी सविस्तर योजना तयार करणाऱ्यांचे कौतुक केलें व संस्थेस यश येण्याची इच्छाही व्यक्त केली. पण वयाच्या ५८ व्या वर्षी पुन: प्रिन्सिपॉलची जबाबदारी पत्करावी असे त्यांस मनापासून वाटेना.

गेली कित्येक वर्षे ते आपल्या आवडीप्रमाणे थिऑसिफिकल सोसायटीचे कार्य करीत होते व आम्ही पत्र पाठविलें तेंव्हा ते अड्यार येथेच होते. श्री. तात्यासाहेब केळकर यांचा पुत्रनिरपेक्ष वात्सल्यसंबंध असूनहि त्यांची प्रवृत्ति या कार्याकडे होईना. त्यानंतर बंगलोर येथील श्री. के. डी. जोशी यांची तात्पुरती संमति मिळविली होती. तसेच संस्थेचें काम अडूं लागलें तर श्री. रा. ब. एन. एस. जोशी यांनी काम करण्याचे कबूल केलें. या दोन जोशींपैकी कोणाचे तरी नांव कळवावे अशा विचारांत होतों. तोच आश्चर्याचा धक्का बसण्यासारखी गोष्ट घडली. प्रि. जी. एन. तथा तात्यासाहेब गोखले यांजकडून २३ ऑक्टोबरला संमतिदर्शक अनुकूल तार आली. त्यांची संमति आल्याने आमची मोठी चिंता दूर झाल्याचा आनंद आम्हांस झाला. त्याबाबत त्यांनी सांगितलेली हकीकत अशी :- थिऑसफिकल सोसायटीचे नवे अध्यक्ष श्री. जिनराजदास यांचेबरोबर श्री. गोखले यांचे मनांत असलेली थिऑसफिकल सोसायटीच्या परदेशातील प्रचाराची योजना कशी प्रचारांत आणावी यासंबंधी विचारविनिमय चालला असतां महाराष्ट्राची शाखा अधिक समृध्द करावयास पाहिजे; तेव्हा तुम्ही पहिले सहा-सात महिने तिकडेच काम करावे हे बरें असे त्यांनी प्रि. गोखले यांना सुचविले. तेंव्हा सांगली इंजिनिअरिंग कॉलेजचे नवे काम मी पत्करावे अशी माझ्या स्नेही मंडळींची विनंती आहे व तें काम या महाराष्ट्राच्या प्रचाराचे कामीं पोषकच ठरणार आहे, तेंव्हा तें मी करावें की काय असे गोखले यांनी त्यांस विचारतांच `हे काम अवश्य स्वीकारावें ` अशी त्यांनी संमति दिल्यामुळे प्रि. गोखले यांस सांगली कॉलेजचे काम स्वकारण्याची स्फूर्ति झाली व

`प्रिन्सिपॉलचे काम मी स्वीकारतों ` अशी तार लगेच करून आम्हांस कळविले. या तारेनें आमचा चिंतेचा भाग खूपच हलका झाला व तारेप्रमाणे चारआठ दिवसांत ते पुण्यास येऊन पोचलेही. ताबडतोब आम्ही युनिव्हर्सिटीला कळविले की प्रि. जी. एन. गोखले हे कॉलेजचे प्रिन्सिपॉल म्हणून आमचेतर्फे येणार आहेत. तेव्हा युनिव्हर्सिटीच्या कमिटीने कॉलेजची सर्व माहिती देण्यासाठी आम्हांस मुंबईला बोलविले.

सोसायटीचे रजिस्ट्रेशन झाल्यावर सोयटीची पहिली सभा तारीख १२ सप्टेंबर १९४५ या दिवशी लॉ कॉलेजचे जागेंत भरून जरूर ते ठराव करण्यांत आले. त्यावेळी सर्व प्रस्थापक सभासद हजर होते व पहिल्या सात वर्षाकरिता अधिकाऱ्यांची निवडही झाली. त्यांत (१) चेअरमन - श्री. एफ. डी. पदमजी,
(२) व्हाइस चेअरमन - श्री. श्री. गो. मराठे,
(३) खजिनदार - श्री. ध. कृ. रानडे,
(४) सेक्रेटरी - धों. कृ. साठे, व बाकी सर्व सभासद होते.

यानंतर तयारी करतां श्री. गोखले यांनी पूर्वीच्या योजनेची तपासणी करून पहिल्या वर्षाचे तयारीसाठी काय वस्तु लागतील व त्या कोठे व काय किंमतीस मिळू शकतील याच्या चौकशीस सुरवात केली. इमारत, जागा वगैरेंची व्यवस्था करण्याचे काम श्री. धों. कृ. साठे यांचेकडे सोपविण्यात आले. जागा व इमारतीची सोय करण्याचे बाबतींत लॉ कॉलेजची जी जागा खरेदी करण्याची जरूरी होती. त्या बाबतीत अनेक ठिकाणी चौकशी करून श्री. साठे यांनी श्री. हरि विठ्ठल तुळपुळे यांची स्वारगेटाजवळ असलेली नऊ एकर जागा शंभर वर्षांचे भाडेपट्ट्यानें (जरूर पडल्यास खरेदी करण्याचें ठरल्यास किंमतीचा आकडा ठरवून) कायम करून टाकली. परंतु पहिलीं एक दोन वर्षे तरी लॉ कॉलेजचे मदतीचा फायदा घेणे अवश्य होतें. त्या बाबतीत श्री. नानासाहेब घारपुरे यांनी आत्मीयतेनें मदत करून त्यांच्या सोसायटीच्या काही अडचणी दूर करून घेऊन जागा देण्याचे कबूल केले व फेब्रुवारीचे पहिल्या आठवड्यांत वर्कशॉप बांधण्याकरतां पाया उकरण्याचा मुहूर्तहि करण्यात आला.

ही वर्कशॉपची इमारत लॉ सोसायटीचीच होणार असल्यामुळे या इमारतीचा खर्च त्यांनीच करावा हें त्यांनाही पटले होते. परंतु त्यांना ते सोसायटीकडून मंजुर करून

घेता आले नाही. त्यात पंधरा दिवस गेले. त्यामुळे इमारत ताबडतोब पूर्ण होण्याची शक्यता दुरावली. सोसायटीजवळ जमलेले ८० ।९० हजार रूपये इंप्लिमेंटसाठी खर्च करावयाचे होते. त्या बाबतीतहि सरकारी कंट्रोल व त्यामुळे येणाऱ्या अडचणी यामुळे ती जमवाजमवहि अशक्य वाटूं लागली. युनिव्हर्सिटीने दिलेल्या विशेष सवलतीमुळे १५ मार्चपर्यंत तरी ही सर्व सिध्दता दाखविणे आम्हांला जरूर होते. मार्चमध्ये हे स्पष्टच झाले कीं, १९४६ साली कॉलेज सुरू होऊ शकत नाही. त्यामुळे या प्रयत्नांची समाप्ति मार्च १९४६ अखेरच झाली. सोसायटीजवळ त्या वेळी फक्त ८०-८५ हजार रूपये शिल्लक राहिले होते.

मे १९४६ मध्ये सर्व प्रस्थापक सभासद एकत्र विचारविनिमयाकरितां जमले. व पुन: नेटाने प्रयत्न करावा असे ठरलें. या वर्षी सुरूवातीपासूनच श्री. जी. एन. गोखले यांचे मार्गदर्शन लाभले होते व सरकारी ९३ कलमी राज्यकारभार संपून कॉंग्रेस मंत्रिमंडळ काम करूं लागले होते. म्हणून नवा प्रयत्न सुरू करताना नामदार बाळासाहेब खेर यांचा सल्ला घेऊन आपला बेत आखावा असें योजिले.

ना. खेर यांची भेट सप्टेंबरमध्ये झाली. त्यांनी आमच्या प्रयत्नांबद्दल सहानुभूती व्यक्त केली. सरकार लवकरच अहमदाबाद येथे एक इंजिनिअरिंग कॉलेज काढणार असल्याचे त्यांनी सांगितले व मुंबई राज्याच्या वाटणीच्या दृष्टीने तुमचें कॉलेज पुणे येथे न काढता कर्नाटकात ते काढले गेले तर सरकारला अधिक मदत करतां येणे शक्य होईल असा अभिप्राय व्यक्त केला. पुणे येथे सरकारी मान्यता मिळाली तरी सरकारी ग्रँट कमी मिळू शकेल हे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे कॉलेज उभारणीसाठीं युनिव्हर्सिटीकडे जो अर्ज करावयाचा त्यांत कॉलेजचे स्थान अनिश्चित असल्याचे कळवावे लागले. सोसायटीने इतकाच निर्णय घेतला की पुण्यास कॉलेज न काढता ते सांगली, बेळगांव, धारवाड या भागांत काढावे. त्याप्रमाणे श्री. गोखले यांनी त्या भागांत जाऊन लोकमताचा अंदाज व अनुकूलता यांचा कयास घेऊन सांगली येथेच कॉलेज काढावे असे आपले मत व्यक्त केले. सांगलीचे राजेसाहेबांनीही सांगली येथे कॉलेज निघण्यास मदत देण्याचें कबूल केले. तसेंच जवळपास संस्थाने असून त्यांचेकडूनही मदत मिळण्याची शक्यता होती. त्याप्रमाणे सांगलीसच कॉलेज काढण्याचा आमचा निर्णय आम्ही मुंबई विद्यापीठास कळविला.

दि. ३१ मार्च १९४७ ला कॉलेजच्या पायाचा दगड बसविण्याचा समारंभ सांगलीच्या राणीसाहेब श्रीमंत सौ. सरस्वतीबाई पटवर्धन यांचे हस्ते करण्यात आला व जून अखेर दोन लॅबोरेटरीज, कॉलेजची मुख्य इमारत, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह अशा जरूर त्या सर्व इमारती सुमारे सात लक्ष रूपये किंमतीच्या सहा महिन्यांत पुऱ्या करण्यांत आल्या. त्या कामी सांगली येथील इंजिनिअर श्री. वामनराव कुंटे व पुण्याचे काँट्रॅक्टर श्री. रंगूमामा जोगळेकर व सांगली येथील काँट्रॅक्टर कै. बाबूराव वडार यांची चांगली मदत झाली. वास्तुशांत समारंभ १२/६/१९४७ ला झाला. या वेळी सातारचे कलेक्टर श्री. हुबळी सहकुटुंब उपस्थित होते.

कॉलेजच्या इमारती सात लक्ष रूपयांच्या व इतर सामग्री तीन लक्ष रूपयांची अशी दहा लक्ष रूपयांची सिध्दता करण्याकरतां सांगलीच्या राजेसाहेबांनी एक लक्ष रूपयांची देणगी, श्री. श्री. गो. मराठे यांनी आपल्या स्वतःच्या पतीवर दोन लक्ष रूपयांची तीन वर्षांच्या मुदतीची कर्जाऊ रक्कम जमखिंडीचे राजेसाहेब यांचेकडून मिळविली ती, व श्री. साठे यांनी १९४० मध्ये स्थापन केलेल्या प्रॉपर्टी इन्व्हेस्टमेंट कंपनी लि. या कंपनीच्या ठेवींपैकी तीन लक्ष रूपयांचा उपयोग, तसेच प्रस्थापकांपैकी कर्नल श्री. श्री. आ. फाटक यांनी पन्नास हजार रूपये संस्थेच्या स्वाधीन केले ते व इतर अनेकांनी ठेवी व देणग्या दिल्या त्या, तसेच काहींनी उधारीने मदत केली ती, या सर्वांचा उपयोग झाला. याचे फलित स्वरूप म्हणजे कॉलेजची उभारणी जूनअखेर झाली असे म्हटले पाहिजे.

मुंबई युनिव्हर्सिटीने १ जून १९४७ ला पहाणी करण्यासाठी चौकशी कमिटी पुनः पाठविली होती. त्यावेळी कमिटीच्या तीन सभासदांपैकी श्री. एन्. व्ही. मोडक हे एकटेच येऊ शकले. त्यांनी सर्व प्रकारची चौकशी करून, कॉलेज जूनमध्ये सुरू करता येणे शक्य आहे असा अभिप्राय व्यक्त केला व त्याप्रमाणे हा अभिप्राय युनिव्हर्सिटीकडे कळविला. ता. २३ जून १९४७ ला सरकारी मान्यताही मिळून कॉलेज सुरू करता आले.

कॉलेजकरितां युनिव्हर्सिटीकडून संलग्नतेची जी मान्यता मिळाली होती, त्यातील

आर्थिक अटी पुऱ्या करण्याचे काम अवघड वाटण्यासारखेच होते. उदा. --
पहिली अट - फक्त साठच विद्यार्थांना प्रवेश देण्यात येईल अशी होती. वास्तविक एका वर्गाची ७५ विद्यार्थ्यांची परवानगी द्यावयास पाहिजे होती. ती कोणाच्या तरी अनुदार वृत्तीने ६० करण्यात आली. त्यामुळे संस्थेचे सहा हजार रूपयांचे नुकसान झाले.
दुसरी अट - अशी होती कीं साठच मुलांच्या कॉलेजला सुरवात करून तीन वर्षे चालविले असता सुमारे दीड लाख रूपयांचे नुकसान सोसायटीस येण्याची शक्यता आहे; यासाठी सोसायटीने कॉलेज चालविण्याची जबाबदारी स्वीकारताना दीड लक्ष रूपयांची रक्कम युनिव्हर्सिटीच्या नांवाने वर्गीकृत केलेली अशी कोणत्यातरी शेड्यूल्ड बँकेत ठेव म्हणून ठेवावी.
तिसरी अट - अशी होती की, प्रवेश करीत असलेल्या साठ विद्यार्थ्यांना डिग्रीपर्यंत पोचविण्याची जबाबदारी, तीन लक्ष रूपयांची जामिनकीच्या स्वरूपाची रोख रकमेचे वरीलप्रमाणे डिपॉझिट ठेवून, सोसायटीने पत्करावी.
चौथी अट - दरवर्षी वीस हजाराप्रमाणे पांच वर्षात एक लक्ष रूपयांचा रिझर्व्ह फंड तयार करावा.
या जबरदस्त अटींची कल्पना मे महिन्यांतच आम्हांस आली होती. त्यापैकी दीड लक्ष रूपयांची तरतूद आम्ही मनाने अशी योजिली होती कीं - श्री. बाळासाहेब खेर यांनी आश्वासन दिल्याप्रमाणे दोन लक्ष रूपयांची मदत मुंबई सरकारकडून लौकरच मिळून आम्ही त्या अटीची पूर्तता करू शकू. पण मुंबई सरकारची मदत मिळावयाची ती लवकरात लवकर म्हटले तरी ऑक्टोबरपर्यंत मिळणे कठीणच होते. कारण सप्टेंबरांत असेंब्ली अधिवेशनात ग्रँट मंजूर होऊन नंतर ती मिळावयाची ! परंतु संलग्नतेची मान्यता मिळावयाच्या आंत या सर्व अटी पुऱ्या करावयास हव्या होत्या.

वरीलपैकी दीड लाखाची व्यवस्था आम्ही पुढीलप्रमाणे केली :-

सहा स्नेह्यांकडून प्रत्येकी २५ हजार रूपये याप्रमाणे तीन वर्षे मुदतीच्या ठेवी घेऊन त्यांची दीड लक्ष रूपयांची रक्कम युनिव्हर्सिटीच्या नांवे वर्ग केलेली अशी ठेव ठेवून ही अट पुरी केली. ज्या गृहस्थांनी ही अट पुरी करण्याचे कामी मदत केली त्यांच्या नावांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करतो.
(१) श्री. के. व्ही. केळकर,

(२) श्री. स. ग. गोखले,
(३) श्री. के. एम. व्होरा, मुंबई,
(४) श्री. वि. श्री. पटवर्धन, मिरज,
(५) श्री. सी. जे. शहा,
(६) पुणे अ. वि. गृहाचे श्री. वि. गं. केतकर.

(त्यांच्या संस्थेजवळ अशी काही रक्कम होती व तिचा उपयोग शैक्षणिक कार्याकडे करण्यास थोडा अवधि होता. म्हणून त्यांनी ही रक्कम आमच्या कार्याला तात्पुरती दिली व आमच्या संस्थेस अपूर्व उत्तेजन दिले. या त्यांच्या थोरवीबद्दल आम्ही त्यांचे सदैव ऋणीच राहूं. ही रक्कम त्यांना परत गरज लागेपर्यंत त्यांनी आमच्याकडे ठेव स्वरूपात ठेवली होती.)

सर्व ठेवीदारांना असा विश्वास वाटत होता की, बँकेतील ठेव जरी दुसऱ्याचे नावांने असली तरी ती पूर्ण सुरक्षित आहे. याप्रमाणे दीड लाखाची व्वस्था झाली व तीन लाखांची व्हावयाची राहिली. त्या कामी महाराष्ट्र बँकेचा उपयोग होईल अशी एकदा कल्पना आली. पण प्रस्थापक सभासदांपैकी चार पांच जण बँकेचे डायरेक्टर असल्यामुळे तसे करणे हितकर नाही असें म्हणून तो मोह आम्ही कटाक्षाने टाळला. तीन लाख रूपयांची अशा स्वरूपाची मदत करूं शकेल अशी महाराष्ट्रातील दुसरी संस्था म्हणजे वेस्टर्न इंडिया विमा कंपनी. त्यांचेकडे शब्द टाकण्याचे ठरविले.

त्याप्रमाणे श्री. आण्णासाहेब चिरमुले यांची गाठ घेऊन संस्थेची गरज व असे पैसे ठेवण्यात कशी सुरक्षितता आहे याबद्दलची सविस्तर माहिती त्यांनी दिली. हा व्यवहार बँकेच्या साध्या व्यवहारांत बसणारा केव्हांच नव्हता हे आम्हांस कबूल करावेच लागले. परंतु केवळ संस्थेची उपयुक्तता पाहून आमची सोय करण्याचे त्यांनी दूर करण्याकरिता बोर्डाची विशेष सभा घेऊन आमचे कार्य पुरें केले. त्याकरिता त्यांनी आपल्या स्वदेशी कमर्शिअल बँकेचाहि आम्हांस उपयोग करू दिला, व आमची अडचण भागविली. त्याकरितां श्री. चिरमुले, त्यांचे डायरेक्टर बोर्ड, स्वदेशी कमर्शिअल बँक या सर्वांचे कायमचे ऋण संस्थेवर आहे.

इतक्या अवघड अटी पुऱ्या करून महाराष्ट्रात ९२ वर्षानंतर दुसरे इंजिनिअरिंग कॉलेज स्थापन करण्याचे श्रेय आम्हास मिळाले. संकल्पित अहमदाबाद येथील सरकारी कॉलेज अथवा आनंद येथील कॉलेज निघण्यास आणखी एक वर्ष जावे लागलें. कराची येथे एक इंजिनिअरिंग कॉलेज होते, ते पाकिस्तानमध्ये गेल्याने त्याचे जागी हे दुसरे कॉलेज त्याच गृहस्थांचे हातून महाराष्ट्रात - म्हणजे त्यांचे मायभूमींत स्थापले गेले.

कॉलेजच्या इमारती वगैरे पुऱ्या होऊन त्यांचा उद्‌घाटनसमारंभ श्री. बाळासाहेब खेर यांचे हातूनच व्हावा अशी आमची इच्छा होती. त्याप्रमाणे त्यांचे हस्ते २९ नोव्हेंबर १९४७ या दिवशी हा समारंभ करण्यांत आला. त्यापूर्वीच सरकारकडून अपेक्षित अशी दोन लक्ष रूपयांची मदत आम्हांस मिळाली होती. उद्‌घाटनप्रसंगी श्री. बाळासाहेब खेर यांनी आपल्या अनुभवाने असें सांगितले की, 'सरकारी कॉलेज काढण्याचे प्रयत्नास एक दोन वर्षे अवधिही लागला असता व त्याच्या खर्चाची एस्टिमेट्स तीस लाखांहून सत्तर लाखांवर न्यावी लागली असती !' 'तुम्ही हे कॉलेज २५ लाख रूपयांत उभे करण्याची महत्वाकांक्षा बाळगतां हे विशेष. त्यात सरकारची मदत निदान पांच लाखांची असावी असे मला वाटतें. ती देण्याचा मी प्रयत्न करीन. पण इतर कॉलेजें, जी निघू इच्छितात त्यांना द्यावयाच्या मदतीच्या प्रमाणावर ही रक्कम अवलंबून राहील.'

या पुढचा उल्लेख थोडासा वैयक्तिक असला तरी तो मला करावासा वाटतो. कॉलेज सुरू होईपर्यंत जो उत्साह होता, त्यामुळे उभारलेल्या कर्जाबद्दल बेगुमानपणा वाटत असे व श्रमही अतिशय होऊं शकत. पण कॉलेज उघडल्यानंतर दहा लक्ष रूपयांच्या कर्जाचा बोजा हा तापदायक होऊ लागला. अखंड चिंतेने भीतीचा धसकाच बसत असे व त्यामुळे माझी प्रकृति पुष्कळच खालावली. सप्टेंबर - ऑक्टोबर पासून पडलेल्या ताणाचा शीण जाणवूं लागला; आणि अनेक प्रकार उद्भवले. तापही येऊं लागला. त्यानंतर जबरदस्त कावीळ झाली व त्यांतून थोडीफार सुधारणा होण्यास फेब्रुवारी ४८ पर्यंत अवधिही लागला. उद्‌घाटन समारंभानंतर एक महिना स्वस्थ पडूनच रहावें लागले. अशा मन:स्थितीत डिसेंबरअखेरचे सुमारास प्रतिकूल अशा स्वरूपाची धक्का देणारी एक घटना कॉलेजात घडून आली.

सोसायटीचे कामासाठी इमारतीचे देखरेखीकरितां जे कारकून होते त्यांचेकडून कोणा

तरी एका प्रोफेसरांचा अपमान झाल्यामुळे कॉलेज बंद करण्याची काही तरी योजना आखली गेल्याची तार येऊन धडकली. त्यावेळी प्रि. गोखले हे तेथे नव्हते. पण त्यांनी त्वरेने जाऊन ते सर्व प्रकरण मिटवले; पण दोन वर्षांत प्रतिकूल असा हा धक्का प्रथमच बसला. त्यानंतर दुसऱ्या टर्मचे सर्व कारभार सुरळीत चालून परीक्षेपर्यंत सर्व व्यवस्थित चालले. परीक्षेमध्ये साठ पैकी फक्त बावीसच विद्यार्थी पास झाल्याचे कळलें. हा निकाल अर्थातच असमाधानकारक होता; व त्यास आमच्या संस्थेच्या वैगुण्यापेक्षा इतरही अनेक कारणें होती. म्हणून त्याबद्दल विशेषसा विषाद वाटला नाही. या अवधीत सरकारकडूनही चालू खर्चाकरितां ३३ टक्के ग्रँट २५ हजार रूपयांची मिळाली. तरी सुध्दा कॉलेज चालविण्याची वर्षाची तूट साठ हजारांवर गेली. याशिवाय कर्जाचे व्याज सोसायटीस सोसावे लागले ते वेगळेच !

आम्हांस युनिव्हर्सिटीकडून प्रथम संलग्नतेची मान्यता मिळाली होती ती फक्त एक वर्षापुरतीच होती. त्यामुळे दुसऱ्या वर्षी आहे तीच संलग्नतेची मान्यता चालू ठेवण्याचा व दुसरे म्हणजे एस. ई. चा वर्ग चालू करण्याचा अर्ज ३१ ऑगस्टच्या आंतच करावा लागला. तो केला गेला व त्यासाठी मुंबई विद्यापीठाकडून चौकशी कमिटी वगैरे नेमली गेली. पण त्या बाबतीत प्रि. गोखले हे अनुभवी व माहितगार असल्यामुळे आम्हांस पुढच्या वर्षाबद्दल चिंता वाटत नव्हती; फक्त श्री. गोखले सुचवतील तेवढे पैसे उभे करणे एवढेंच आमचे काम होते.

संस्थेचा व्याप वाढू लागला तेव्हा संस्थेच्या उद्देशाप्रमाणे संस्थेच्या अधिक शैक्षणिक सोयींसाठी अधिक जागा घ्यावी असा विचार माझ्या मनांत आला. संस्थेच्या उद्देशांत वैद्यकीय व शेतकीविषयक शिक्षण देण्याच्या योजना घातलेल्या होत्या. संस्थेजवळ आतापर्यंत ५० एकर जागा खरेदी झालेली होती. समोरच्या विलिंग्डन कॉलेजजवळ १२५ एकर जागा आहे, तेव्हा आपल्या संस्थेजवळही इतकी जागा असावी असे वाटूं लागले. आमच्याच प्रयत्नांने तेथील जागांच्या किंमती हळू हळू वाढू लागल्या होत्या. म्हणून आजूबाजूची सुमारे १०० एकर जागा मिळावी असा अर्ज श्री. गोखले यांचे विचाराने करण्याचे साहस मी केले. त्याकरिता एक लाख रूपये खर्च करावे लागतील असे धरले. त्यास बोर्डाची परवानगी हवी होती. बोर्डानेही सातारचे कलेक्टरांची पूर्ण सहानुभूति व वर्षभराच्या चढत्या कार्याकडे लक्ष देऊन माझ्या आग्रहाला मान्यता दिली

व अर्ज केला गेला. त्यानंतर परिस्थिती बदलत जाऊन त्यास पुष्कळ अडथळे निर्माण झाले; परंतू सातारचे कलेक्टर श्री. हुबळी यांचे आत्मीयतेचे सहाय्यामुळे १९४९ पर्यंत दम काढल्यानंतर संकल्पित सर्व जागा संस्थेस मिळाली. किंमत मात्र एक लाखांऐवजी दीड लाख रूपये पडली ! या प्रकरणाची सर्व हकीकत १९४९ च्या वृत्तान्तात स्वतंत्र परिच्छेदांत येईल.

१९४६ च्या नोव्हेंबरमध्ये इमारतीचे कामास सुरवात झाली; व चौकशी कमिटीही येऊन गेली. त्यानंतर मला असे वाटू लागले की, या कामी दैवी कृपा मिळाली तरच आपल्याला यश येऊ शकेल. या दृष्टीने मी गणपति उपासनेचे एक अनुष्ठान करण्याचें योजिलें. माझें उपास्य दैवत श्रीगणपति असल्यामुळे, व मी पूर्वी एकदा असेच अनुष्ठान केले असल्यामुळे पुन्हा एकदा असे अनुष्ठान करण्याचे ठरविले. ते अनुष्ठान असे :-

एकवीस आवर्तनाच्या एकवीस आवृत्या दररोज करून एकवीस दिवस ते चालवावें. त्याप्रमाणे २६ डिसेंबर १९४६ पासून १५ जानेवारी १९४७ पर्यंत मी ते अनुष्ठान कॉलेजच्या जागेवर केले. त्यावेळी विकत घेतलेल्या जागेचा शेतकरी व मी असे दोघेच तेथे होतो. या जागेत असलेल्या विहिरीच्या पश्चिम बाजूला पूर्वेकडे तोंड करून ३०' बाय ३०' ची जागा आखून घेऊन व त्यावर तट्ट्याची झोपडी करून घेतली व पूर्वाभिमुख मूर्ति ठेवून अनुष्ठान केले. २१ आवृत्त्या होण्यास बारा तास अवधि लागे. त्या अवधींत उच्चारांचे स्खलन होऊ नये म्हणून बरोबर एक गुरूजी आवर्तने म्हणावयास येत असत. असे ते तीन तीन तासांनी बदलून येत असत. त्याबद्दल त्यांना दक्षिणा देत असे, त्यांच्या भोजनाची व्यवस्थाही गांवात केली होती. असे अनुष्ठान चालू असताना नैतिक बळ वाढत असल्याचा प्रत्यय मनास येत होता. मी एकभुक्तच असे.

विलिंग्डन कॉलेजच्या क्लबाचा आचारी मला सायंकाळी एक ताट वाढून आणून देत असे. दिवस थंडीचे होते, प्रकृति सुदृढ होती, आहारविहार मर्यादित होता, त्यामुळे मनास अत्यंत प्रसन्नता वाटे. कामावरचे बिगारी घरी गेल्यानंतर सकाळपर्यंत तो शेतकरी व मी एवढेच त्या रानांत राहात होतो. त्या अवधींत कोल्हापूर संस्थानचे अँडमिनिस्ट्रेटर कर्नल हार्वे हे सांगलीस आले असताना सांगलीचे राजेसाहेब त्यांना घेऊन अनुष्ठानाचे ठिकाणी आले होते. कर्नल हार्वे साहेबांना आम्ही म्हणजे मी व प्रि.

गोखले - भेटून कोल्हापूर संस्थानकडून निदान दोन चार लाख रूपयांची मदत मिळावी अशी विनंती करून आलो. त्या वेळी पुण्यातील कॉलेजांत संस्थानिकांचे प्रजाजनांना प्रवेश मिळण्यास अडचण पडत असे. म्हणून राजे साहेबांनी एक लक्ष रूपये दिले, त्यावेळी संस्थानचे चार नागरिक या कॉलेजात घ्यावे अशी अट सांगलीच्या राजेसाहेबांनी घातली होती. तशीच अट कोल्हापूरनेंही घालून आम्हांस मदत करावी अशी आमची विनंती हार्वे साहेबांना पाहिली होती. म्हणून ते कोल्हापूरचा नवा दत्तक ठरला म्हणजे हे काम होऊं शकेल असे म्हणाले होते. या संबंधी माझे समक्ष अनुष्ठानाचे ठिकाणी राजेसाहेबांचे हार्वे साहेबांशी जे बोलणे झाले त्यांत त्यांनी माझे अभिनंदन केले व ते सांगलीलाच आले याबद्दल त्यांना धन्यवाद दिले.

या अनुष्ठानांत अनपेक्षित असे एक चमत्कारिक विघ्न एक दिवस आले. ४ जानेवारीला दुपारी २ वाजल्यापासून ढग जमूं लागले, वारे वाहू लागले व पावसाची वृष्टि होण्याची भीति वाटूं लागली. ७ वाजेपर्यंत अनुष्ठान चालू असल्यामुळे काही निवारा करता येण्याची शक्यताही झाली नाही. त्यानंतर पाऊस येण्याची खात्रीच वाटू लागली. त्यावेळी शेतकऱ्याने व मी कामावरील दोन पत्रे घेऊन श्री गणपतीचे संरक्षणासाठी एक खोपी उभी केली. झोपडीवर पत्रे घालण्याची सोयच नव्हती. रात्री दहाचे पुढे वादळ सुरूं होऊन दोन वाजेपर्यंत खूप पाऊस पडला. निवाऱ्याचे छतांचे तट्टे व बाजूचे भिंतीचे तट्टेही उडून गेले व मुसळधार पावसाने झोपडीत पाणीच पाणी झाले. दोन तीन वाजता आकाश निवळले व सकाळी सातला पूर्ववत सर्व अनुष्ठान व्यवस्थित सुरू करता आले. शेतकरी म्हणाला: पावसाने शेतातील किडे, मुंग्या, साप बाहेर येऊ शकतात; पण तसा काही प्रकार झाला नाही. अनुष्ठानांतील सर्व दिवशी श्री. हरिभाऊ पटवर्धन हे सकाळी अगर संध्याकाळी येऊन एक दोन आवर्तने म्हणून जात असत. समाप्तीचे दिवशी राजेसाहेब स्वत: मोटार घेऊन त्या जागी आले व मला प्रसादासाठी घेऊन गेले. अनुष्ठानानें मनास खूप प्रसन्नता आली व यश येणार अशी खात्री वाटू लागली.